# “ घे उंच भरारी ”

**भावना गोखले**




*नुकताच जागतिक महिला दिन विविध स्तरांवर सर्वत्र साजरा करण्यात आला. भारत सरकारच्या महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या वतीने दरवर्षी प्रातिनिधिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करून देशाच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या, बहू कल्पकता असणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात येतो. या वर्षी देशभरातून ३१ महिलांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात येऊन त्यांना ८ मार्चला म्हणजे जागतिक महिला दिनी गौरविण्यात आले. आज पासून प्रत्येक महिन्यात दोन अशा ३१ जणींच्या कामगिरीची ओळख "घे भरारी" या मालिके मधून करून देणार आहोत. आपले अभिप्राय आम्हाला pibmarathi@gmail.com आणि pibmumbai@gmail.com या मेल वर अवश्य कळवा.*

२१ व्या शतकाच्या वाटचालीत आता पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या महिला नवीन नाहीत, महिलांची बदलती आव्हाने त्यांना नवीन क्षितिजे गाठण्याची प्रेरणा सदैव देत असतात आणि यातूनच निर्माण होतात विशेष हिरकण्या ज्यांना एक पैलू पडायला जावे तर त्यांचे हजार पैलू उजेडात येतात. रीमा साठेय हे नाव तसे कुणाच्या लक्षात येण्यासारखे नव्हते परंतु केंद्र सरकार तर्फे जागतिक महिला दिनी ‘नारी शक्ती पुरस्कार २०१६’ देऊन गौरविण्यात आल्या नंतर त्यांची खरी ओळख समाजाला झाली. व्यवसायाने केमिकल इंजिनीयर असणाऱ्या रीमाजींनी आठ वर्षे विपणन आणि वित्तीय क्षेत्रात अनुभव घेतला. त्यांनी

सुरवातीचे साडे चार वर्ष ' इको लॅब' या अमेरिका स्थित नामांकित कंपनी मध्ये भारतासाठी विपणन अधिकारी म्हणून ऑन लाईन काम केले. " कृषी स्टार " येथे वर्षभर महाव्यवस्थापक म्हणून काम करतांना महाराष्ट्र आणि गुजरात येथील छोट्या टोमॅटो उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी विपणन संलग्नता सुरु केली यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ मिळवण्यासाठीचे श्रम वाचले आणि प्रत्यक्ष बाजारपेठेशी संलग्नता वाढून विक्री मध्ये वाढ झाली.

नोकरी करतांना घेतलेल्या ज्ञानाचा फायदा काही तरी भरीव करावे या इच्छा शक्तीत परावर्तित झाला आणि आपण समाजाचे काही तरी देणे लागतो या उद्देशाने त्यांनी चाकोरी बद्ध नोकरीकडे पाठ फिरवून स्वतःच्या व्यवसायाला सुरवात केली . त्यांनी 'हॅपी रूट्स' या संस्थेची स्थापना करून महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र पश्चिम आणि दक्षिण महाराष्ट्र या पाच विभागातील आदिवासी शेतकरी आणि महिलांना एक नवा कवडसा उघडून दिला .

**भरीव काय** ?

कृषी स्टार येथे काम करतांना शेतकऱ्यांशी झालेली चर्चा , त्यांच्या समस्या आणि त्यांच्या समोर असलेली आव्हाने रीमाजींना स्वस्थ बसू देईनात म्हणून त्यांनी महाराष्ट्रातील आदिवासी बहुल प्रदेशांना भेटी देण्याचे ठरवले. महाराष्ट्रभर सर्वत्र भेट देतांना त्यांना जाणवले की, फक्त एक दिवसाची रोजी रोटी मिळविणाऱ्या शेतकऱ्यांना शेतीसह पूरक उद्योगाची जोड दिल्यास त्यांचा रोजचा प्रश्न सुटेल. या संकल्पनेतुनच हैप्पी रूट्स या संस्थेची स्थापना त्यांनी केली. हैप्पी रूट्स सामाजिक उपक्रम असून महाराष्टातील पाच विभागात कार्यरत आहे.

त्यांच्या आदिवासी क्षेत्राच्या भेटी बद्दल विचारले असता त्या म्हणाल्या की, भारतातील शेतकरी राष्ट्राला पोषक धान्यांचे भरीव उत्पादन देतो परंतु त्याची स्वतःची रोजची कमाई रुपये १४० पेक्षा जास्त नाही (२$ प्रतिदिन ). "शेतकी उत्पादनाला कमी मूल्य आणि आधुनिक प्रक्रिया कौशल्याचा अभाव या कारणांमुळे शेतकरी नेहमीच कमी उत्पन्न गटा मध्ये अंतर्भूत झाला असून कर्जाचा ससेमिरा त्याच्यापासून सुटला नाही. ही परिस्थिती बदलण्याचे आम्ही ठरवले असल्याचे सीमा साठे म्हणाल्यात.




**विशेष प्रयत्न**

रीमा साठे व्यवसायाने केमिकल इंजिनिअर तसेच वित्त आणि विपणन क्षेत्रात व्यावसायिक व्यवस्थापन पदव्यूतर झाल्या असल्याने त्यांनी कृषी उत्पादन संशोधना बरोबर विपणन संशोधनावरही जोर दिला एवढाच करून त्या थांबल्या नाहीत तर शेतकऱ्याची नफा मर्यादा कशी वाढेल याकडे त्यांनी लक्ष दिले; परिणाम स्वरूप जो शेतकरी पहिल्यांदा १० ते २०% सीमांत नफा घ्यायचा तो आता १००% नफा मिळवू लागला यासाठी शेतकऱ्यांना हॅपी रूट्स कडून मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाले. हैप्पी रूट्स, पाच सहा शेतकऱ्यांकडून कच्चा माल प्रत्यक्षपणे खरेदी करून त्याचा उपयोग पोषक स्नॅक्स बनविण्यासाठी करायची. शेतकऱ्यांना उत्कृष्ट बाजारभाव मिळवून देण्याच्या आश्वासनामुळे शेतकऱ्यांचा हॅपी रूट्स वरचा विश्वास वाढला

“सध्या आमच्याकडे महाराष्ट्र आणि महाराष्ट्रा बाहेरील १०,००० शेतकऱ्यांचे आणि २,००० महिलांचे नेटवर्क असून आम्ही त्यांना उत्तम बाजारभावाची हमी दिली आहे त्यामुळे हे शेतकरी आमच्या साठी उत्कृष्ट प्रतीचे धान्य राखून ठेवतात.” असे ही रीमा म्हणाल्यात

**भविष्यातील योजना**

अहमदनगर , अमरावती, पुणे, कोल्हापूर, सातारा या जिल्ह्यातील गैर सरकारी संघटना आणि शेतकरी समूहांबरोबर हॅपी रूट्स सध्या पर्यावरण शिक्षण केंद्रावर (सी इ इ) काम करीत असून या प्रकल्पांतर्गत, भारतातील अशी पिके जी बाजारपेठ न मिळण्याच्या अभावामुळे धोक्याच्या पातळीत असून दुर्लक्षित आहेत त्यांच्या साठी बाजारपेठ स्थापन करण्याचा प्रयत्न हैप्पी रूट्स करीत आहे. संस्थेचा प्रयत्न अशा पिकांना पुनर्जीवन मिळवून शहरी ग्राहक बाजारपेठेत विक्रीसाठी स्थान मिळवून देणे हा आहे. या संदर्भातील संस्थेचा पहिला प्रयत्न यशस्वी झाला असून बट्टू (buckwheat) आणि काळभात (black husk rice) ही पिके जी सह्यांद्रीच्या डोंगराळ भागात पर्जन्य प्रवण क्षेत्रात वाढतात त्यांना नव्याने जीवन मिळाले आहे.

Black husk Rice Seeds



साठे यांना त्यांच्या भविष्यातील योजने बद्दल विचारले असता त्या म्हणाल्या की, हैप्पी रूट्स च्या विस्ताराची कल्पना असून त्यासाठी आवश्यक अर्थ सहाय्यासाठी बँकेचे कर्ज घेतले आहे.

फक्त राजस्थान, हरियाणा मध्ये आतापर्यंत उत्पादित होणाऱ्या बार्ली (जव) चे उत्पादन (जे भरपूर प्रोटिन्स साठी प्रसिद्ध आहे ) महाराष्ट्रात घेण्याचे ठरविले असून त्या साठी पीक संशोधन चालू आहे, हा प्रकल्प विकसित झाल्यास नवीन खाद्य संशोधन करून नवनवीन स्नॅक्स ची निर्मिती करता येईल.

सध्या स्थानिक पिकांवर अन्नप्रक्रिया चे नवीन प्रयोग चालू असून यासाठी महिला बचत गटांना हाताशी धरून शेतकऱ्यांकडून मिळालेल्या प्रत्यक्ष कच्चा मालाच्या साहाय्याने जसे की साखर, तेल, धान्य , इत्यादी अत्यंत पोषक तत्वांनी युक्त असे स्नॅक्स आम्ही तयार करीत आहोत त्या मुळे स्थानिक महिलांचा रोजगाराचा प्रश्न सुटला असून आम्हाला रास्त किमतीत कच्च माल मिळतो. यासाठीच आमच्या उत्पादनांच्या किमती कमी असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या भविष्यातील योजना पूर्ण होण्यासाठी त्यांनी उंच भरारी घ्यावी अशा शुभेच्छा देऊन ही मुलाखत इथेच संपवू या.

**पी.आई.बी/भावना गोखले/अनघा**

*******